पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O. OFFICE GADCHIROLI
PHONE NO. 07132223142
E-MAIL : prospoffice.gadchiroli@gmail.com
E-MAIL : progadpolice@mahapolice.gov.in

वार्तापत्र

दिनांक- १२/०७/२०२६

गडचिरोली पोलीसांनी केला अवैध दारु व चारचाकी वाहनासह एकूण ८,२४,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त

गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी असतांना अवैधरीत्या छुप्या रीतीने दारु विक्री व वाहतूक करण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्याविरुध्द पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. एम. रमेश यांचे अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर प्रभावीपणे कायदेशिर कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. यावरुन काल दिनांक ११ जुलै २०२६ रोजी पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री. अनिकेत हिरडे व त्यांच्या पोलीस पथकाने पोस्टे चामोर्शी हद्दीत सापळा रचून अवैद्य देशी-विदेशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरुध्द कारवाई केलेली आहे.

सविस्तर वृत असे आहे की, काल दिनांक ११ जुलै २०२६ रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. अनिकेत हिरडे यांना गोपनिय बातमिदाराकडून माहिती मिळाली की, महिंद्रा कंपनीची एक लाल रंगाची एक्सयुव्हि क्र. एम.एच. ४९ ए. ई. ५९२५ या चारचाकी वाहनाने अवैधरित्या देशी-विदेशी दारुची वाहतूक केली जाणार आहे. अशा मिळालेल्या माहितीवरुन सहाय्यक पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. अनिकेत हिरडे व त्यांच्या पथकाने मौजा कुनघाडा फाटा येथे सापळा रचला असता, सदर संशयास्पद चारचाकी वाहन येताना दिसून आल्याने वाहनास अडविण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी राजेंद्र सपन मंडल याने यु टर्न घेऊन रस्त्यावरील एका अन्य चारचाकी वाहनास धडक देऊन पळून गेला. त्यानंतर सहा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री. हिरडे व त्यांच्या पोलीस पथकाने आपले वाहन अडकले असल्यामूळे एका खाजगी वाहनाला थांबवून, लोकांना विचारत तसेच आरोपीच्या वाहनाच्या टायर मार्क्सची पाहणी करत संशयित गाडीचा पाठलाग सुरु करुन गाडीचा शोध घेतला असता, आरोपी हा आपल्या ताब्यातील वाहन मौजा पोटेगाव दिशेने नवरगाव जंगल परिसरात उभे करुन जंगलाचा फायदा घेत पसार झाला होता.

यानंतर पोलीस पथकाने पंचासमक्ष सदर चारचाकी वाहनाची तपासणी केली असता, सदर चारचाकी वाहनामध्ये १) ९० एम.एल मापाचे रॉकेट देशी दारु संत्रा कंपनीच्या ३५ नग खरड्याचे बॉक्समध्ये ३५०० नग प्लॉस्टीक सिलबंद बॉटल अंदाजे किंमत २,८०,०००/- रुपये, २) ५०० मि. ली. मापाच्या ०१ नग खड्र्याचे बॉक्समध्ये २४ नग हॅवड्र्स ५००० कंपनीच्या बिअरचे सिलबंद पत्र्याचे कॅन अंदाजे किंमत ७,२००/- रुपये ३) १८० एम. एल. मापाचे रॉयल स्टॉग कंपनीचे विदेशी दारूच्या ०१ सीलबंद दारूचे बॉक्स प्रत्येकी एका बॉक्स मध्ये ४८ नग काचेच्या सिलबंद निपा अंदाजे किंमत १६,८००/- रुपये ४) ९० मि. ली. मापाच्या रॉयल स्टॅग कंपनीचे ०१ नग खड्याचे बॉक्समध्ये १०० नग काचेच्या सिलंबद निपा अंदाजे किंमत २०,०००/- रुपये व ५) अवैद्य देशी-विदेशी दारूची वाहतूक करण्याकरिता वापरण्यात आलेली चारचाकी वाहन क्रमांक एक्सयुव्हि क्र. एम.एच. ४९ ए. ई. ५९२५ किंमत अंदाजे ५,००,०००/- रुपये **असा एकूण ८,२४,०००/- रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेला आहे.**

संबंधीत घटनेच्या अनुषंगाने पोस्टे चामोर्शी येथे दिलेल्या तक्रारीवरुन अप क्र. ३५७/२०२६ कलम २८१ भा.न्या.सं., सहकलम ६५ (अ), ९८ म.दा.का., सहकलम १८४ मो. वा. का. अन्वये फरार आरोपी **नामे राजेंद्र सपन मंडल, वय २७ वर्षे, रा. कुनघाडा, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.** फरार आरोपीचा शोध घेणे सुरु असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि. शाहु दंडे पोस्टे चामोर्शी हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. एम. रमेश यांच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. कार्तिक मधीरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी. यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. अनिकेत हिरडे व त्यांच्या पोलीस पथकाने पार पाडली.